महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/वसतीगृह/२०२१/ ५०२० दिनांक : १०.११.२०२१

तात्काळ
परिपत्रक:
(कालमर्यादा : दि. ११.११.२०२१)

प्रति,
संचालक/प्राचार्य,
विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील
सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी
तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था.

विषय : राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांचेशी संलग्नित महाविद्यालयातील वसतीगृहे टप्प्या-टप्प्याने सुरु करणेबाबतची माहिती.

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण२०२१/प्र.क्र.६/विशे-३, दि १३.१०.२०२१
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. २अ/एडीएम/वर्ग/२०२१/४३८ दिनांक १०.११.२०२१

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयात नमूद केलेल्या मुद्दा क्रमांक ६ मध्ये वसतीगृहे टप्प्या-टप्प्याने सुरु करण्याबाबत संचालक, तंत्रशिक्षण यांनी आढावा घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी असे नमूद केलेले आहे.

त्याअनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांचेशी संलग्नित महाविद्यालयातील वसतीगृहे टप्प्या-टप्प्याने सुरु करता येईल का याबाबतचा अहवाल संचालनालयास सादर करावयाचा असल्याने, सर्व संस्थांनी आपल्या संस्थेची माहिती सोबत जोडलेल्या गुगल फॉर्ममध्ये भरुन उद्या **दिनांक ११.११.२०२१ (संध्याकाळी ५ वाजेपर्यंत)** सबमीट करावी. सोबत गुगल फॉर्मची लिंक देण्यात येत आहे.

गुगल फॉर्म लिंक :
https://forms.gle/th9FaARH4ZzRqNFD8

(मा. रा. जाधव)
सहायक संचालक (तां),
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे १६.

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्र. २अ) यांना माहितीस्तव सादर.